**आपद्कालिन काळात पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी करावयाची उपाययोजना.**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-१०९६/प्र.क्र. १२९०/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २६ जून, १९९७.**

**वाचा :-** १) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२८०/पापु ०७ दिनांक २८.११.१९९६

२) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२९०/पापु ०७ दिनांक १९.३.१९९७.

**प्रस्तावना :-** राज्यातील काही भागांमध्ये अधूनमधून नैसर्गिक आपद्कालिन परिस्थिती उद्‌भवते. ही परिस्थिती प्रामुख्याने भूकंप, अतिवृष्टी, अवर्षण इत्यादी कारणामुळे उद्‌भवलेली असू शकते. अशा आपत्तीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाच्या योजनांना मोठया प्रमाणावर क्षती पोहोचते व त्या विस्कळीत होतात. त्यामुळे साहजिकच अशा भागातील नागरिकांना पिण्याचे शुध्द व सुरक्षित पाणी पुरविण्यामध्ये मर्यादा पडतात. पिण्याचे पाणी शुध्द स्वरुपात नसल्यामुळे किंवा उपलब्ध न झाल्यामुळे संसर्गजन्य व साथीचे रोग फैलावण्याची दाट शक्यता असते. या संदर्भामध्ये मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपद्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी राज्यस्तरीय समितीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये या संदर्भात सखोल विचार-विनिमय करण्यात आला.

**परिपत्रक :-** प्रस्तावनेत नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती लक्षात घेता राज्यातील ज्या भागामध्ये आपद्कालिन परिस्थिती उद्‌भवेल अशा भागातील जनतेस पिण्याचे पाणी शुध्द स्वरुपात मिळेल याबाबत संबंधित यंत्रणांनी काळजी घ्यावी या संदर्भामध्ये प्रामुख्याने खालील उपाययोजना करण्यात याव्यात :-

(१) पिण्याचे पाणी ज्या स्त्रोतामधून पुरविण्यात येते त्या स्त्रोताचे शुध्दीकरण दररोज करण्यात यावे.

(२) अशा भागामध्ये असणाऱ्या प्रत्येक घरी पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी पुरेशा प्रमाणात क्लोरीनच्या गोळया वा तत्सम औषधीद्रव्य पुरविण्याची खबरदारी घेण्यात यावी.

(३) पिण्याचे पाणी उकळून व गाळून घेण्याबाबत जनतेस विनंती करण्यात यावी.

(४)टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्यास टँकरमुळे पाणी प्रदूषित होत नाही याची खात्री करुन घ्यावी. तसेच टँकरमध्ये पाणी भरल्यानंतर पाण्यात क्लोरिनच्या गोळया टाकाव्यात.

(५) पिण्याच्या पाण्याचे नमुने जमा करुन त्याची तपासणी प्रयोगशाळेत करुन घेण्यात यावी.

(६) पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या टीसीएल अथवा तत्सम औषधीद्रव्यांचा पुरेसा साठा गावामध्ये राहील याची खात्री करण्यात यावी.

(७) विस्कळीत झालेल्या पाणी पुरवठा योजनेची दुरुस्ती ही तातडीने होण्यासाठी अशा क्षेत्रातील योजनेच्या देखभाल व दुरुस्तीला प्राधान्य देऊन ती करण्यात यावी.

(८) असुरक्षित पाणी घेऊ नये असे लोकांना सागांवे.

वरीलप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही यासंबंधामध्ये आढावा घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी/ गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी वेळोवेळी भेटी द्याव्यात व त्यांचे संनियंत्रण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा. उपमंख्यमत्र्यांचे सचिव.
४. मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी. १५ जादाप्रतीसह सर्व गट विकास अधिकारी यांना पाठविण्यासाठी.
८. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी.
९. संचालक, आरोग्य सेवा , महाराष्ट्र राज्य मुंबई.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई.
११. मुख्य अभियंता (ग्रामीण) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई.
१२. संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१३. सह संचालक, आरोग्य सेवा, सेंट्रल बिल्डींग, पुणे.
१४. उप संचालक , आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
१५. सर्व परिसर अभियांत्रिकी मंडळाचे अधिक्षक अभियंता.
१६. सार्वजनिक आरोग्य विभाग/ ग्राम विकास व जलसंधारण विभाग/ नियोजन विभाग/ वित्त विभाग/ अन्य मंत्रालयीन विभाग.
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१८. निवडनस्ती. पापु-०७.